# राशिभविष्य - फेब्रुवारी, २०१८.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल व लहरी असा झाला असावा असे जाणवते. त्यामुळे कोणी समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या, उपदेश केला तरी ते अपमानास्पद वाटत असावे. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड, व्रात्य, खोडकर झाली असण्याची शक्यताही जाणवते. पण या प्रथम स्थानातील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होणेही संभवते. तथापि या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू अनिष्ट असून कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करील. जपा. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होणार असून तो या राशीच्या मंडळींच्या इच्छा आकांक्षा पूर्ण कारीलसे दिसते. हाती घेतलेल्या जबाबदारीच्या कार्यात प्रगती होईल, यश मिळेल, आर्थिक लाभ होतील. काही मंडळींना बढती, पगारवाढ असे काही मिळेल, तर काहींना मानाचे स्थान वा प्रतिष्ठा प्राप्त होईल. मोठ्या कर्तृत्ववान मंडळींच्या ओळखी होतील व त्यातून अधिक प्रगतीची संधी मिळेल. त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्यही चांगले राहील. या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय असणाऱ्या मंडळींच्या व्यवसायात वाढ होणेही शक्य आहे. या राशीच्या युवकांनी आहे ती नोकरीच व्यवस्थित करावी. त्यात बदल करण्याचा किंवा नवे काही करण्याचा विचारही करू नये. नुकसान होणे संभवते. जपा. महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर शुक्र ग्रह या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व त्यामुळे सर्व काही मनासारखे घडेल व सर्व प्रकारचे सुख समाधान मिळेल. मन:शांतीही मिळेल. पण आर्थिक व्यवहार मात्र विचारपूर्वक करा. आर्थिक घोटाळे, नुकसान होणे संभवते. जपा. तसेच कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. मात्र वीज, पाणी यांपासून धोका असल्याने जलप्रवास करू नका. तसेच सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहेच. उष्णता विकारांचे आजार त्रस्त करतील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना सुखशांती देईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या पूर्वार्धात भय, निराशा, मानहानी विरोध अशापैकी घडणाऱ्या घटनांचा अनुभव येणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलेल. पुष्कळसे मनोनुकुल असे घडून येईल. काहींच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील; तर काहींना बढती, पगारवाढ असे काही मिळू शकेल. मोठ्या वजनदार मंडळींच्या ओळखी होतील व त्या ओळखीचा लाभदायक उपयोग होणे शक्य होईल. शिवाय मानसिक, कौटुंबिक सुख समाधान लाभेल. पण या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल ग्रह मात्र या राशीच्या काही मंडळीना असह्य मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. स्वतंत्र व्यापार, व्यवसाय असणाऱ्या काही जणांना काळ अनुकुल होईल; तर काहींना अस्थिर परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. मानसिक रोग तज्ञ आणि द्रव पदार्थांचे व्यापारी यांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला गुरु आरोग्य उत्तम राखण्यास उपयुक्त होईल; पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि मात्र काही मंडळीना असह्य मनस्ताप देईल, असे वाटते. वैवाहिक जीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी सुखसमाधान लाभणे अशक्य होईल. ज्यांचा

भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशयाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला राहू अनुकुल होणार असला तरी काहीही कारणाने बंधुसुखात बाधा निर्माण करील. जपा. तसेच भाग्यस्थानी असलेल्या केतूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना करा. त्यामुळे मन:शांती लाभेल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्याची काळजी घेणे अगत्याचे होईल. उष्णताविकार बळावतील व त्यामुळे काही मंडळींना ताप येणे, अंगावर फोड येणे, रक्तविकार, हृदयविकार वाढणे, काहींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. चोरी किंवा आर्थिक नुकसानीमुळे काहींना असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. राहूमुळे आर्थिक चिंतेसह कौटुंबिक वाद, भांडणे आदि कारणामुळे कौटुंबिक सुखातही बाधा येणे शक्य दिसते अपार कष्ट सहन करावे लागतील. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल, उच्च संशोधक बुद्धी असणारांना आपल्या संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल . ज्यांचे प्रेमसंबंध आहेत त्यांच्या प्रेमसंबंधात वाढ होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात अपेक्षाभंगाचे दु:ख सहन करावे लागेल. इच्छाअपेक्षा पूर्ण करण्यात अडथळे निर्माण होतील. त्यामुळे संतप्त व्हाल. काही मंडळीना वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. बढतीची अपेक्षा जे करत असतील त्यांची निराशा होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात बुध-शुक्राच्या अनुकुलतेमुळे जन्मकुंडलीत योग असतील तर विविध प्रकारे आर्थिक लाभाच्या घटना घडतील. मात्र या राशीच्या वृध्द मंडळींना मनस्तापच सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलेल. मानसिक सुख लाभेल. खूप काही मनासारखे घडेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. काहींना सूचक स्वप्ने पडतील. काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. मात्र कारण असो वा नसो, मित्रांशी भांडणे होणे संभवते. जपा. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व येणारे नैराश्य दूर होईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात मनस्ताप देणाऱ्या घटना सहन कराव्या लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे स्वत:लाच त्रास करून घ्याल. पण मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण केलेत तर खूपच बरे होईल. नपेक्षा अनारोग्य होऊन वातविकाराचा एखादा आजार त्रस्त करील. या महिन्यात या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळींचा त्रास होणे संभवते. जपा. तसेच मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे विक्षिप्त व मनाविरुद्ध आचरण, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, वकिली, सल्लागारी व्यवसाय, कोळसा, लोखंड व्यापारी, तसेच शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना या महिन्याचा काळ संपूर्ण काळ अनकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना मात्र महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध मात्र शारीरिक-मानसिक अनारोग्यकारक

होण्याचीच शक्यता आहे. जपा. तसेच प्रथम स्थानी असलेल्या राहूमुळे व सप्तम स्थानी असलेल्या केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर नोकरीव्यवसायात व कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच नेपच्यूनमुळे पाण्यापासून धोका संभवतो. तसेच विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. अशा परिस्थितीत बुध ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच कुलदैवताची उपासनाही केल्यास मानसिक शक्ती प्राप्त होईल व मन:शांती लाभेल.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच शारीरिक-मानसिक आरोग्यही फारसे बिघडणार नाही. व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे अर्थलाभ होईल; पण हाच राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना त्यांच्या कार्यात यश लाभेल व अर्थलाभही होणे शक्य दिसते. पण काही मंडळीजवळ ज्ञान , अनुभव असूनही योग्य संधी मिळत नसल्याची त्यांना खंत वाटेल. त्यामुळे नैराश्य येऊन ते व्यसनाधीन होणेही संभवते. जपा. काही मंडळींना नसते आळ आल्याने असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. विकृत प्रेमप्रकरणामुळेही असे आळ येणे शक्य आहे. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी मनापासून खूप प्रयत्न करावा लागेल. पण स्वार्थी, मतलबी बुद्धी असेल तर फारशी प्रगती होणे संभवत नाही. या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या लेखकांचे साहित्य ग्रंथरूपाने प्रकाशित होणे शक्य आहे. पण याच गुरु ग्रहामुळे काहींना भावंडाकडून होणारा त्रास सहन करावा लागण्याची शक्यताही आहे जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि, बुध या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर विविध कारणांनी मानसिक त्रास सहन करावा लागेलसे दिसते. तसेच या स्थानातील नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण गुरु ग्रहाच्या शुभ दृष्टीमुळे फारसा मनस्ताप होणार नाही, असे वाटते. या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना अर्थलाभ होणे संभवते; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे झाल्यास किंवा असमाधानकारक घटना घडल्यास कौटुंबिक सुख व गृह सौख्य मिळणे अशक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळींना वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल; तर काहीना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. काहींना प्रिय जणांशी दूरत्व आल्याने अस्वस्थ वाटेल, तर काही जणांना संततिविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शुक्रामुळे या राशीच्या कलाकारांना कलेत प्रगती होत असल्याचे समाधान मिळेल; पण त्यातून अर्थलाभ वा प्रसिद्धी असे काही मिळणार नाही. काहीना जडत्व आल्याने किंवा अनारोग्यामुळे इच्छा असूनही काहीही बौद्धिक काम करण्याची इच्छाच होणार नाही. काही मंडळींना पोटविकार त्रस्त करील. जडत्व, अनारोग्य, काही करू नयेसे वाटणे अशापैकी कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक

प्रगतीत बाधा येणे संभवते. जपा. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना उगीचच आपल्याला कोणता तरी आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. जपा. तसेच या राशीच्या काही मंडळीना आर्थिक फसवणूक झाल्याची चिंता त्रस्त करील. या राशीच्या तृतीय स्थानी स्वराशीत असलेल्या मंगळ ग्रहामुळे
आत्मविश्वास वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल, धैर्य वाढेल व आपल्या कार्यातून आपली कर्तबगारी सिद्‌ध होईल. प्रवासाचे योग येतील. पण अपघात भय असल्याने शक्यतो प्रवास करूच नका. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे अपेक्षित गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या ज्या मंडळींना वाममार्ग धन अगदी सहज मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. या राशीच्या ज्यांना लॉटरी सारख्या जुगारांचा नाद आहे त्यांनी तो नाद सोडावा असे आग्रहाने सांगावेसे वाटते. तसेच आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यासही मनस्तापच सहन करावा लागेल. जपा. श्रद्‌धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. पण अपवाद म्हणून या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना नोकरीत अधिकार पद मिळणे संभवते. तसेच कोणा एकास सत्तास्थान, तर अन्य एकाचा सन्मान होणे संभवते. इतरांना नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास सहन करावा लागेल. अपमान होणे संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप होऊन शारीरिक अनारोग्य होणेही शक्य दिसते. जपा. शिवाय अन्य कौटुंबिक त्रास होणेही शक्य आहे. जपा. नियोजित कार्यात अडथळे येणे, दिरंगाई होणे, खर्च वाढणे अशा समस्याही त्रस्त करतील. काही मंडळींना प्रिय जनांच्या दूरत्वामुळे अस्वस्थ वाटेल. पण बुधामुळे मित्रसुख मिळेल. ज्यांच्याकडे शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल व गृहसौख्य लाभेल. मनस्थिती अति भावनाशील होणेही संभवते. पण ज्यांना अध्यात्मात रस आहे अशांना उपासनेद्‌वारे मन:शांती मिळू शकेल. काही मंडळींना संततीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे या राशीच्या युवकांना नवी मनासारखी नोकरी मिळू शकेल; तर काहीना आवडते कार्यक्षेत्र मिळेल. पण हाच शनि ग्रह भावंडविषयक एखादी चिंता निर्माण करील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, मतभेद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय आदि कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या धनस्थानी असलेला मंगळ आर्थिक समस्या वाढवील व उष्णता विकारांनी अनारोग्य निर्माण करील. घसा , मान, दाढा यांपैकी एखादा आजार होणे संभवते. जपा. श्रद्‌धा असेल तर कुलदैवताची उपासना करा. त्यामुळे मन:शांती लाभेल.

**(८) वृश्चिक - शनि** ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे. त्यात पुन्हा शनि-मंगळ हे एकमेकांचे शत्रू आहेत. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी आपल्या अहंकारी स्वभावावर नियंत्रण ठेवून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा हट्‌टी, दुराग्रही स्वभावामुळे व मानापमान फार असल्यामुळे या राशीच्या मंडळींना अकारण नको ते परिश्रम करावे लागतील व त्यामुळे होणारी दगदग सहन करावी

लागेल. त्याचा परिणाम म्हणून शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. शिवाय आर्थिक समस्या वाढण्याची शक्यताही आहे. जे आधीच कर्जबाजारी आहेत त्यांच्या कर्जात वाढ होणेही संभवते. काही मंडळींना कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागेल. या महिन्याच्या पूर्वार्धात रवि-शुक्र हे ग्रह अनुकुल असल्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत योग्यतेनुसार बढती, मानाचे स्थान वा एखादे उच्च पद मिळू शकेल. सर्व प्रकारचे आरोग्य सुधारेल व सुखसमाधान लाभेल. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कामावर प्रसन्न होतील.

शुक्र ग्रहामुळे काही मंडळींना भूमिलाभ किंवा धनलाभ होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण हितशत्रूपासून जपावे. हितशत्रूचा त्रास होणे संभवते. तसेच बंधुसुखात बाधा येणे संभवते. ज्यांचे बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र आहे त्यांनी अति विचार करू नये. नपेक्षा काहींना डोकेदुखीचा तर काहींना मेंदू विकाराचा आजार त्रस्त करील. जपा. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. प्रवासाचे योग येतील. पण प्रवासात त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी असलेला गुरु ग्रह अध्यात्म व सामाजिक कार्यात रस असणारांना अनुकुल व सुखकारक होईल. पण कौटुंबिक जीवनात अपेक्षाभंग व मनस्ताप देणाराच असेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात शनि-मंगळ हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. शिवाय रवि ग्रह सुद्धा महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी महिन्याच्या पूर्वार्धात शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम प्रकारे सांभाळून शांतपणे काळ व्यतीत करावा व महिन्याचा उत्तरार्ध बऱ्याच प्रमाणात अनुकुल होणार असल्यामुळे त्या काळात जे काय साध्य करावयाचे त्याची पूर्व तयारी करून ठेवावी. तेच सुखाचे होईल. महिन्याच्या पूर्वार्धात सतत मनाविरुद्ध घटना घडत गेल्या तर स्वत:वरच चिडाल व त्यामुळे उष्णता भडकून डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. तसेच काहीना वातविकार त्रस्त करतील. त्यात जीवनसाथीच्या अनारोग्याची भर पडण्याची शक्यताही जाणवते. नियोजित कार्यात अडथळे निर्माण होतील. कुटुंबातील प्रिय जनांचे स्थलांतर झाल्यामुळेही अस्वस्थता व नैराश्य त्रस्त करील. या राशीच्या व्ययस्थानी असलेला स्वराशीचा मंगळ पूर्णपणे अशुभ असून ज्यांचा स्त्री-वर्गाशी व्यावसायिक संबंध आहे त्याना स्त्रियांकडूनच मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. त्यातच आर्थिक समस्यांची भर पडण्याची शक्यता आहे. जपा. पण धनस्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. महिन्याचा पूर्वार्ध शांत मनाने व नम्रतेने व्यतीत केलात तर महिन्याच्या उत्तरार्धात खूपच मनोनुकुल घटना घडतील. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील. त्यामुळे काहींना बढती, क्वचित कोणास उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळू शकेल. आर्थिक लाभही होतील. त्यामुळे आरोग्यही सुधारेल. पण हितशत्रूंचा त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल . रवि-गुरु शुभ योगामुळे इच्छा-आकांक्षा पूर्ण होतील. वाहनसुख मिळेल. धनलाभ होईल. विवाहेच्छूना विवाहयोग येईल. गुरु-हर्षल शुभ योगामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे व अपेक्षित यश मिळवणे सहज शक्य होईल. कलाकारांना कलाविष्कारास काळ अनुकुल होईल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात

कार्यरत असणारांना अपेक्षित प्रगती साधणे व यश मिळविणे शक्य होईल. प्रेमप्रकरणात पुढाकार घेणाराला अपेक्षित साथ मिळू शकेल. जन्मकुंडलीत योग असेल तर अचानक धनलाभ होणेही संभवते. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. मनशांती मिळेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल आहे असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु ग्रह आणि अल्प प्रमाणात शुक्र ग्रह अनुकुल असल्यामुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाच नोकरी - व्यवसायाच्या दृष्टीने काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. म्हणून या राशीच्या मंडळींनी या प्रतिकुल काळात अत्यंत सावधानतेने, विचारपूर्वक सर्व व्यवहार करावेत व सतत नम्रतेचे आचरण करावे. काही नवीन करण्याच्या भानगडीत पडू नये. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असून शनि ग्रह या राशीच्या व्ययस्थानी आहे. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच मनस्ताप, मानहानी होणे संभवते. आर्थिक व्यवहार तर अतिशय काळजीपूर्वक व विचारपूर्वक करा. नपेक्षा कोर्ट लचांडाचा ससेमिरा मागे लागेल. जपा. जे काय मिळावयाचे ते सहजासहजी न मिळता अति कष्ट-परिश्रमानेच मिळणार आहे. त्यामुळे चिडू नका, संतापू नका. सहनशील व्हा. तरच मित्रांशी वितुष्ट येणार नाही. उलट काही भाग्यवंतांना तर एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभही होऊ शकेल. रवि-शनि हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार तर काहीना वातविकाराचा आजार त्रस्त करील. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर सतत मनस्थिती शांत ठेवून भावनांचा क्षोभ होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. कुसंगतीपासून दूर राहा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे कोणाशी पटणार नाही, आहे त्यात सुखसमाधान मिळणार नाही, वास्तुसुख मिळणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. त्यामुळे घरातील सर्वांनाच मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. जपा. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय चंचल, लहरी असा झाला असावा असे वाटते. त्यात भर म्हणून मानसिक संवेदना अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असण्याची दाट शक्यता दिसते. रवि-बुध हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्याने मानहानी, दु:ख, चिंता, अपयश यांमुळे मनस्थिती अस्वस्थ होत असावी. त्यात आर्थिक समस्यांची भर पडत असल्यास कशी कुचंबणा होत असेल याची कल्पनाच करवत नाही. अशा परिस्थितीतही गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक-मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे अगत्याचे होईल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर विशेष काळजी घेऊन मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. आर्थिक नुकसान होणे संभवते. जपा. तसेच काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. काहींचे मित्रांशी वितुष्ट येणेही संभवते. शनि-हर्षल या चिकित्सक बुद्धी असणाऱ्या ग्रहांमध्ये धुभ योग असल्याने चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल . पण विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्याशी वितुष्ट येणे

संभवते. जपा. काही मंडळींना हातचे सोडून काही नवीन करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरीच करावी. तेच सुखाचे होईल. काही मंडळींच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. पण
यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय, औषधविक्रेते, वैद्यकीय व्यवसाय असणारांना काळ अनुकुल होईल. ज्यांचा परजातिधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे विविध प्रकारचे लाभ होतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीहनुमानाची उपासना मन:शांती व सुखसमाधान देईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींनी मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून व जिभेवर ताबा ठेवून आचरण केल्यासच सुखाचे होईल. नपेक्षा आपल्या अविचारी फटकळ बोलण्याने समोरच्याचे अकारण अपमान होतील व त्यामुळे संबंध बिघडतील. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होणार असल्याने त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. कारण महिन्याचा उत्तरार्ध सर्व प्रकारे प्रतिकुल असणार आहे. केवळ गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारानाच काळ अनुकुल होईल. वकिली-सल्लागारी व्यवसाय, लोखंड -कोळसा व्यापारी यांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल.
महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना बढती, पगारवाढ असे लाभ होण्याची शक्यता आहे. काहींना मानाचे स्थान तर काहींना एखादे उच्च पद मिळणेही संभवते. इतरांना सुखसमाधान लाभेल व स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होईल. प्रवासाचे योग येतील; पण प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते, या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हाच राहू व्यापारी कमिशन, दलाली व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. लाभस्थानी असलेल्या शुक्रामुळे धनलाभ, मन:शांती व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ किंवा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल व मनस्थिती प्रसन्न ठेवील. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====